## सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | दर्शना दत्ताराम मालुसरे |
| वय | – | अंदाजे ४१ वर्षे, |
| व्यवसाय | – | हॉटेल कामगार |
| राहणार | – | रा. किंजळोली, ता. महाड, जि. रायगड. |

## सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रशांत गावंड यांच्याकडून

घरी सासु, सासरे, दीर, जावू, नवरा व दोन मुले असे एकत्रत राहतात. तसेच आम्ही शेती देखील करतो. दि.२४/०८/२०१८ रोजी रात्री ०९.३० वाजता मी खरकटे टाकण्यासाठी पाठीमागे जात होते. त्यावेळी बाथरुममध्ये शिवा मोरे आला होता. त्यावेळी मी घरातल्या माणसांना आवाज दिला. त्यावेळी घरातील सर्व लोक आले. त्यानंतर काळोखातून शिवा मोरे पळून गेला. त्यावेळी आमच्या घरातील सर्व लोक त्याला पकडायला गेली असता तो पळून गेला. त्यानंतर सदर घटनेबद्दल पोलीस घरातील लोकांनी केस केली. आरोपीस पाहिल्यास मी ओळखेन तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी माझे टिपण माझ्या सांगण्याप्रमाणे घेतले. आरोपी सदर घटनेच्या अगोदर २–३ वेळेला माझ्या नवऱ्याला मारायला आला होता.

## उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. रुपेश जाधव यांचे कडून

०२. माझे शिक्षण झालेले नाही. सदर घटनेबद्दल पोलीस स्टेशनला तक्रार माझा नवरा दत्ताराम मालुसरे यांनी दिली. मी घटनेच्या दिवशी पोलीस ठाण्यात गेले नाही. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली नाही. ज्या कंपनीमध्ये आरोपी कामाला होते त्या सुदर्शन केमीकल कंपनीत मी देखील कामाला होते. सदर घटनेच्या पुर्वी आरोपी व माझे चांगले संबंध होते.

आरोपी व मी एकाच गावातील असल्यामुळे व एकाच कंपनीत काम करत असल्यामुळे एकमेकांना मदत करत होते. आरोपीने मला वेळप्रसंगी आर्थिक मदत केलेली होती.

०३. आमच्या घरामध्ये प्रवेश केल्यानंतर पहिला मोठा हॉल आहे. त्या हॉलला लागून तीन रुम आहेत. त्या तीन खोलीपैकी एक खोली बंद आहे, एक बेडरुम व एक देवघर आहे. वर नमूद तीन खोल्यानंतर किचन आहे. किचनच्या पाठीमागे लागून एक संडास व बाथरुम आहे. संडासला खिडकी नाही. संडासच्या पाठीमागील भागामध्ये घटनेच्यावेळी काळोख होता. मी घराच्या पाठीमागे पहिल्यांदा गेले तेव्हा माझ्यासोबत कोणीही नव्हते. संडास पासून घरातील लोकांना आवाज दिल्यास तेथून घरातील लोक होते ते ठिकाण ४० ते ५० पाऊल अंतरावर आहे. घटनेच्यावेळी आमच्या घरातील लोकांव्यतिरिक्त आजूबाजुचे कोणीही लोक नव्हते. सदर घटनेनंतर मी घटना सांगण्यासाठी हॉलमध्ये आली. त्यानंतर घरातील लोक व मी असे मिळून पुन्हा संडासच्या ठिकाणी आलो. त्यावेळी आरोपी हा त्या ठिकाणी नव्हता.

०४. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४/०८/२०१८ रोजी रात्री ०९:३० वाजता मी खरकटे टाकण्यासाठी पाठीमागे गेल्याचे, त्यावेळी बाथरुममध्ये शिवा मोरे आल्याचे, त्यावेळी मी घरातल्या माणसांना आवाज दिल्याचे, त्यावेळी घरातील सर्व लोक आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर काळोखातून शिवा मोरे पळून गेल्याचे, त्यावेळी आमच्या घरातील सर्व लोक त्याला पकडायला गेली असता तो पळून गेल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सदर घटनेबद्दल घरातील लोकांनी केस केल्याचे, पोलीसांनी माझे टिपण माझ्या सांगण्याप्रमाणे घेतल्याचे, आरोपी सदर घटनेच्या अगोदर २-३ वेळेला

माझ्या नवऱ्याला मारायला आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस मी ओळखते व मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक ०६/०३/२०२४